# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ११.०७.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १०.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०८ ईसमांवर कारवाई करून १,०४,८७५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०२ ईसमावर कारवाई करुन ११,०४०/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,०१२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ३,४३,७००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथक पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १०.०७.२०२६ चे १७.०० वा. ते १९.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, तकीया झोपडपट्टी येथे एक इसम गांजा विक्री करीत आहे. अशा खात्रीशीर प्राप्त माहितीवरुन, इंडीयन जिमखाना जवळील मोकळे मैदान तकीया येथे सापळा रचून आरोपी निखील लहू हटीटेल वय २६ वर्षे रा. कनाळगाव, सातगाव ता. बुटीबोरी जि. नागपुर यास ताब्यात घेतले. आरोपीजवळील बॅगची पंचासमक्ष पाहणी केली असता, त्यामध्ये हिरव्या रंगाचा पाना—फुलांचा व उग्र वास येणारा अंमली पदार्थ गांजा १ किलो १२३ ग्राम वजनी मिळून आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी खुशाल मरसकोल्हे रा. तकीया, धंतोली (बॅकवर्ड लिंक), नागपुर याचे मदतीने गांजा विक्रीकरीता आणल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन गांजा, ०१ ओपो मोबाईल फोन असा एकुण ४३,०७५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे धंतोली येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह धंतोली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अती. कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षीरसागर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



<u>**३) गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— देहव्यावसाय करवुन घेणाऱ्या आरोपीस अटक. आंतरदेशीय तथा आंतरराज्यीय एकूण ०५ महिलांची सुटका.**</u>

दिनांक १०.०७.२०२६ चे २२.४८ वा. ते दिनांक ११.०७.२०२६ चे ०५.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत, हॉटेल पेटल इन समोर सार्वजनिक ठिकाणी, गोकुलपेठ, खरे टाऊन जवळ, अंबाझरी, नागपूर याठीकाणी देहव्यवसायाकरीता मुलींना ग्राहकांजवळ पाठविले जात आहे. नमुद ठिकाणी सापळा रचुन, प्राप्त माहितीची शहानिशा केली असता, तेथे एक पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी कंपनीची कार क्र. एमएच ३१ एफसी ९१३० यामध्ये एक विदेशी महिला दिसून आली. तिला ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, ती उजबेकीस्तान येथील राहणारी असून, ती नागपूर येथील पेटल इन हॉटेल येथे राहत आहे व पाहीजे आरोपी क्र. १) समिर उर्फ मनिष उर्फ गगन ठाकूर याचे सांगणेवरुन ग्राहकांसोबत देहव्यवसाय करीता येथे आले आहे. त्यावरून गाडी चालक आरोपी क्र. २) सचिन माणिकराव महाजन, वय ३८ वर्षे, रा. भवानी नगर, पुनापुर रोड, नागपुर असे सांगीतले. यास ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, आरोपी क्र. १ याचे सांगण्यावरून पिडीतेस तेथे घेवुन आल्याचे सांगीतले. पिडीतेला अधिक विचारपुस केली असता, पंजाब, कलकत्ता, दिल्ली येथील तिच्या इतर ०४ मैत्रिणी हॉटेल पेटल इन येथे थांबलेल्या असून, त्यांना पाहीजे आरोपी क्र. १), क्र. ३) राहुल नावाचा इसम ४) पुजा नावाची महिला हे त्यांना कमी वेळात जास्त पैसे कमविण्याचे आमिष देऊन ते ग्राहकांसोबत भेट घडवितात असे तिने सांगितले. आरोपीतांनी आंतरदेशीय व आंतरराज्यीय महिलांचे परिस्थीतीचा फायदा घेऊन, त्यांना जास्त पैशांचे आमिष देऊन, त्यांना ग्राहक पुरवून तसेच, जागा उपलब्ध करुन देऊन त्यांचेकडून देहव्यवसाय करवुन घेत असतांना पिडीता समक्ष मिळून आली. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता पिडीत महिलांना ग्राहकांकडे पाठवुन व जागा उपलब्ध करून देवुन त्यांचेकडुन देहव्यापार करवुन घेत असल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळावरून विदेशी व आंतरराज्यीय ०५ पिडीत महीलांची सुटका करण्यात आली. पिडीतेच्या ताब्यातुन रोख ८,०००/—रू., ०१ मोबाईल फोन व आरोपीचे ताब्यातुन मारुती सुझुकी कार असा एकुण किंमती अंदाजे ५,१८,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे कलम १४३(२),१४३(३) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५, अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपी क्र. २) सचिन महाजन यास मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव अंबाझरी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अती. कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, पोहवा. राम निरगुडवार, नापोअं. शेषराव राऊत, पोअं.

कुणाल मसराम, अश्वीन मांगे, समीर शेख, मपोहवा. आरती चव्हाण, अश्वीनी खोडपेवार व पुनम शेंडे यांनी केली.




**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कपीलनगर :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १०.०७.२०२६ चे १३.३० ते १४.०० वा. चे दरम्यान, कपीलनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, म्हाडा क्वॉर्टर ते टायर चौकाकडे जाणाऱ्या रोडजवळील मोकळया मैदानात झाडाचे आडोश्याला एक इसम ज्याने अंगात ग्रे रंगाची टिशर्ट घातलेली आहे, तो कोयता सारखे शस्त्र बाळगून आहे. अशा माहितीवरून तेथे गेले असता, एक प्राप्त वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव यश उर्फ लक्की मनोहर राहाटे वय २६ वर्षे रा. प्लॉट क्र. ५३५, समर्थ नगर, नारी रोड, उप्पलवाडी, कपीलनगर नागपूर असे सांगीतले. त्यांची अंगझडती घेतली असता, त्याचे जवळ एक लोखंडी कोयता किंमती ३००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने लोखंडी कोयता बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं सागर बघेल यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कपीलनगर येथे पोउपनि रणजीत रणनवरे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०६.०७.२०२६ चे ०६.४० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मामेभाऊ अमृत रमाकांत राखुंडे वय २४ वर्षे, रा. वार्ड क्र. ५, ता. हिंगणा, जि. नागपूर हे त्यांचे मोटर सायकल क्र. एमएच ४० बीएक्स ९८६१ ने कंपनीमध्ये कामावर जात असता, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, लोकमान्य नगर, मेट्रो स्टेशन जवळ एका पांढरे रंगाचे चारचाकी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मामेभावाचे मोटारसायकलला मागून धडक मारून, गंभीर दुखापत करून घटनास्थळावरुन पळुन गेला. जखमी फिर्यादीचा उपचार लता मंगेशकर हॉस्पीटल येथे सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी अभिलाष गुणवंतराव वनकर वय २७ वर्ष रा. वार्ड क्र. ४, गिरी ले आऊट, कसबा हिंगणा, यांनी दिनांक १०.०७.२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. प्रशांत पाटील ७८८७८२१२२७ यांनी पांढरे रंगाचे चारचाकी वाहन चालकाविरूध्द कलम २८१,१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १८७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपी वाहन चालकाचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे सक्करदरा :—** श्रीमती सोनाली अरुणजी येसने वय ३७ वर्षे, रा. सोमवारी क्वॉर्टर क्र. ८०/३, सक्करदरा, नागपूर ह्या दिनांक ०७.०७.२०२६ चे ०९.३० वा. पासुन पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील राहते घरुन कामधंदा शोधून येते असे म्हणून कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची—५ फुट २ इंच, केस—काळे लांब, अंगात— काळ्या रंगाचा प्लॉजो व निळसर रंगाचा टिशर्ट ज्यावर इंग्रजीत एबीसीडी लिहलेले आहे. पांढरा सनकोट घातलेला असून सोबत काळी हॅन्डबॅग आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह—दोन्ही हातांवर गोंदलेले असून त्यावर ओम साई लिहलेले आहे.

**२) पोलीस ठाणे पारडी :—** श्रीमती शालु मधुकर कुडे वय ४५ वर्षे, रा. कापसी बुजुर्ग ता. कामठी जि. नागपूर ह्या दिनांक ०८.०७.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरुन कोणाला काही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—मजबुत, उंची—५ फुट २ इंच, डोळे—घारे, नाक—सरळ, केस—काळे लांब, अंगात—फिक्कट जांभळया रंगाची फुलाची डिझाईन असलेला सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह—डोळयावर नंबरचा चष्मा आहे.

**३) पोलीस ठाणे कपीलनगर :—** दीपक नरेश साठवणे वय ३४ वर्षे रा. राजगृह नगर, प्लॉट क्र. २२, एनआयटी गार्डनजवळ, कपीलनगर, नागपूर हे दिनांक ०४.०७.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरुन कोणाला काही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—मजबुत, उंची—५ फुट ६ इंच, केस—काळे, अंगात—डेनिम निळया रंगाचा शर्ट व निळया रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह—डावे हातावर 'माई' असे गोंदलेले आहे.


श्रीमती सोनाली


श्रीमती शालु


दीपक

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**